## नि.दि.मु.क्र.६२/२०२१ मधील आय.ए.क्र. ०२/२०२२ (निशाणी २३) वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र. २ याने त्याच्या विरुध्द झालेला दावा विनाकैफियत चालविण्याचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र. २ याचे असे म्हणणे आहे की कोरोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे, आजारपणामुळे, एस.टी.बस संप असल्याने त्याला वकिलांना भेटून त्यांना कैफियत देण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्र देता आलेली नाहीत. त्यामुळे त्याला कैफियत देणे शक्य झालेले नाही. त्याला त्याची कैफियत दाखल करायची आहे. त्यामुळे त्याची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी त्याने विनंती केली. यावर वादीने म्हणणे दाखल करुन तीव्र हरकत घेतलेली आहे. त्याचे असे म्हणणे आहे की अर्ज खोटा, खोडसाळ असून अर्जात दिलेले कारण पटणारे नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्याने विनंती केली आहे.

०३. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

०४. अभिलेखाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. २ याच्याविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्याचा आदेश दि. ०९/१२/२०२१ रोजी पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र. २ याला दाव्याच्या समन्सची बजावणी दि. २४/०८/२०२१ रोजी झालेली आहे. तेव्हापासून ३० दिवसांत अथवा जास्तीत जास्त ९० दिवसांच्या आत त्याने त्याची कैफियत दाखल करणे अपेक्षीत होते. मात्र त्याने प्रस्तुत अर्ज दि.०३/०२/२०२२ रोजी म्हणजेच समन्सच्या बजावणीनंतर जवळजवळ ५ महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेला आहे. सदर विलंब हा कोरोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे, आजारपणामुळे, एस.टी.बस संप असल्याने त्याला वकिलांना भेटून त्यांना

कैफियत देण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्र देणे शक्य न झाल्याने झाल्याचे प्रतिवादी क्र. २ याचे म्हणणे आहे. त्याचे सदरचे कथन हे त्याने शपथेवर सांगितले आहे. नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या आधारे दोन्ही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब योग्य तो खर्च आकारुन माफ करता येईल असे मला वाटते. त्यामुळे दाव्याचे स्वरुप पाहता व दाव्यामध्ये दोन्ही बाजूंच्या हक्काबाबतचा निर्णय होणार असल्याने प्रतिवादी क्र. २ याला त्याची कैफियत दाखल करण्याची परवानगी देणे उचित होईल असे मला वाटते. कैफियत दाखल करण्यास झालेल्या उशिराबाबत त्याचेवर रक्कम रुपये २००/– खर्च आकारणे योग्य राहील. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत अर्ज वादीला रक्कम रुपये २००/– चा खर्च पुढील तारखेपर्यंत देण्याच्या पुर्व अटीवर मंजूर करण्यात येतो.

प्रतिवादी क्र. २ याच्याविरुध्द झालेला दि. ०९/१२/२०२१ रोजीचा विनाकैफियत आदेश रद्द करण्यात येतो व त्याची कैफियत स्वीकारण्यात येते.

Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2022.03.10 17:52:13 +0530

दि. १०/०३/२०२२ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER